श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

## न्यासाच्या सर्व मालमत्तेची नोंदणी करणे व मालमत्तांचा विमा उतरवण्याकरिता विमायोग्य मालमत्तेचे मूल्यनिर्धारण करणे या कामासाठी कुशल व अनुभवी कंपनीची नियुक्ती करणे बाबत.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास इमारत, प्रतीक्षालय इमारत तसेच रहेजा ग्रंथालय या तिन्ही इमारतीमधील स्थावर मालमत्ता उदा. furniture & fixtures, machinery, security equipment, electronic items, gold silver, copper brass तसेच इतर महत्वाच्या स्थावर मालमत्तेची न्यासाच्या अभिलेख तसेच नोंद वह्यांमध्ये त्या त्या वर्षी नोंद करण्यात आलेल्या आहेत. या सर्व स्थावर मालमत्तेचे नियमितपणे दर वर्षी लेखापरीक्षण केले जाते.

खालील नमूद मुद्द्यांविषयी करावयाच्या कामासाठी या क्षेत्रातील व्यावसायिक तज्ञ / संस्था किंवा व्यक्तीची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

१. स्थावर मालमत्ता (fixed assets) प्रत्यक्षात पडताळणी करणे.
२. मालमत्ता नोंदवही तयार करणे.
३. मालमत्ता नोंदवही व नोंदणी केलेले लेखा अभिलेख यांची एकत्रीकरण करून नोंद घेणे.
४. मालमत्तेचे मुल्यांकन करणे.
५. मालमत्ता मुल्यांकनानुसार विमा उतरविणे.
६. जुन्या मालमत्तेची विल्हेवाट / हस्तांतरण इत्यादींची योग्य नोंद करणे.

या कामासाठी कुशल व अनुभवी कंपनीची नियुक्ती करणे बाबत मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

**वेळापत्रक :**

१. दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत
२. तांत्रिक व मूल्य दरपत्रके उघडण्याचा दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता

**अटी व शर्ती :**

१. दरपत्रकधारकाने कागदपत्रे **A-4 आकाराच्या लिफाफ्यात** सादर करावीत.
२. लिफाफे सादर करतांना तांत्रिक कागदपत्रे व मूल्य दरपत्रक तपशील याप्रमाणे **दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये** भरून त्यावर संपूर्ण नाव, पत्ता दूरध्वनी क्रमांक लिहून **लाखेने सिलबंद** करून न्यास कार्यालयात जमा करावे.
   - **लिफाफा क्र. १ : तांत्रिक कागदपत्रे**
   - **लिफाफा क्र. २ : मूल्य दरपत्रक**
३. कार्यादेश निर्गमित केल्यापासून ३० दिवसांच्या आत काम पूर्ण करावे.
४. दरपत्रक भरताना सर्व प्रकारचे कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये स्विकृत दर अखेरपर्यंत कायम राहतील. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.
५. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करण्यात येईल तसेच सर्व प्रकारचे कर अदा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.
६. कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.
७. कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

८. उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल/सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा व जादा अटी शर्ती विहित करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

९. सदरील दरपत्रके सादर करणेबाबत काही शंका असल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

अ. श्रीमती वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी (मो.क्र. ९९३०९४२४२८)

ब. श्री. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी (मो.क्र. ९३२४९९९०९४)

क. श्रीमती मनाली सावंत, वित्त व लेखा अधिकारी (मो.क्र. ९८२११२८८५१०)

ड. श्री. पी. टी. सांडीम, लेखापाल (मो.क्र. ९७०२४६२०००)

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

**उपरोक्त कामे करून घेण्याच्या अनुषंगाने कामाची व्याप्ती (Scope of Work) खालील प्रमाणे आहे.**

१. दि.३१.०३.२०२५ पर्यंत श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाचे चल / अचल मालमत्तेचे सर्वसमावेशक (comprehensive) परिभाषित नमुन्यानुसार नोंदवहीत नोंदणी करणे. जेणे करून कोणत्याही वेळी नोंदणी नुसार न्यासाच्या मालमत्ता ओळखता येतील.

२. न्यासाच्या कार्यालय परिसरातील संपूर्ण मालमत्तेची सविस्तर भौतिक पडताळणी करताना पडताळणी मध्ये सर्व प्रकारच्या चल / अचल मालमत्तेचा समावेश असेल. भौतिक पडताळणी संगणक, लॅपटॉप आणि संबधित उपकरणे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, फर्निचर आणि फिक्सचर, इत्यादी पुरता मर्यादित नसेल.

३. भौतिक स्थिर मालमत्ता, स्थिर मालमत्ता नोंदणी आणि लेखा नोंदी यांच्यातील ताळमेळ अहवाल तयार करणे आणि त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची शिफारस करणे.

४. मालमत्ता व मालमत्ता नोंदवही अद्यावत करणेबाबत मार्गदर्शन करणे.

५. मालमत्तेचा वाजवी आणि पुरेसा विमा उतरवला आहे का हे तपासणे जेणे करून न्यासाचे आर्थिक नुकसान होणार नाही.

६. कोणत्याही जुन्या मालमत्तेचे हस्तांतरण/विल्हेवाट योग्यरीत्या मालमत्ता नोंदणी आणि लेखा नोंदी मध्ये होत आहे का ते तपासणे.

७. एखाद्या मालमत्तेचे मूल्य बाजार भावा पेक्षा कमी होत असेल तर त्यानुषंगाने मालमत्तेचा एक स्वतंत्र अहवाल तयार करून त्यावर कार्यवाही करण्याची शिफारस करणे.

८. प्रत्यक्ष पडताळणीमध्ये मालमत्तेचा ताबा आणि जमीन व इमारतीच्या मालकीच्या कागदपत्रांची पडताळणी देखील समाविष्ट असेल.

९. दि.३१.०३.२०२५ रोजी भौतिकरित्या सापडलेली परंतु हिशोबाच्या पुस्तकात नोंद नसलेल्या मालमत्तेचे मूल्य, स्वीकृत मुल्यांकन पडताळणीनुसार निश्चित करणे. या मालमत्तेचा घसारा काढणे आणि लिहिलेले मूल्य दि.३१.०३.२०२५ रोजी निश्चित करणे.

१०. योग्य विम्याच्या उद्देशाने जमीन व इमारतीसाठी पात्र मुल्यांकन कर्त्याने स्थिर मालमत्तेचे मुल्यांकन करणे.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
(Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112
www.siddhivinayak.org
admin@siddhivinayak.org

न्यासाच्या सर्व मालमत्तेची नोंदणी करणे व मालमत्तांचा विमा उतरवण्याकरिता विमायोग्य मालमत्तेच्या मूल्याची गणना करणे या कामासाठी कुशल व अनुभवी कंपनीची नियुक्ती करणे बाबत अर्जाचा नमुना : -

(खालील माहिती कंपनीच्या लेटरहेड वर सादर करून आवश्यक कागदपत्रांच्या प्रती सोबत जोडणे बंधनकारक आहे)

| | | |
|---|---|---|
| १ | कंपनीचा नोंदणी क्र. | |
| २ | सी.ए.जी. नोंदणी क्र. | |
| ३ | आय.सी.ए.आय. प्रमाणपत्र | |
| ४ | कंपनी मालक/भागीदार यांचे सर्व तपशील | |
| ५ | सन २०२४-२५, २०२३-२४, २०२२-२३ या तीन आर्थिक वर्षात तत्सम केलेल्या कामाचा अनुभव | |
| ६ | सन २०२४-२५, २०२३-२४ व २०२२-२३ या तीन वर्षांची आर्थिक उलाढाल सरासरी वार्षिक १ कोटी | |
| ७ | आर्थिक वर्ष २०२४-२५,२०२३-२४,२०२२-२३ या तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र | |
| ८ | कंपनीवर कोणत्याही प्रकारचे प्रतिबंध अथवा न्यायालयीन खटला नसल्याचे हमीपत्र | |
| ९ | दरपत्रकांसंबधी सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र | |

दिनांक :
स्थळ:

दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व कंपनीचा शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## मूल्य दरपत्रकाचा तपशील

विषय : न्यासाच्या सर्व मालमत्तेची नोंदणी करणे व मालमत्तांचा विमा उतरवण्याकरिता विमायोग्य मालमत्तेच्या मूल्याची गणना करणे या कामासाठी कुशल व अनुभवी कंपनीची नियुक्ती करण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

(खालील माहिती कंपनीच्या लेटरहेड वर सादर करणे बंधनकारक आहे)

| अ. क्र. | तपशील | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाच्या कार्यालय परिसरातील संपूर्ण चल / अचल मालमत्तेची सविस्तर पडताळणी करणे. मालमत्तेची नोंदवही आणि लेखा नोंदी यांच्यातील अद्यावत अहवाल तयार करणे.न्यासाची मालमत्ता व मालमत्ता नोंदवही अद्यावत करणेबाबत मार्गदर्शन करणे. तसेच मालमत्तेचे मूल्य,स्वीकृत मुल्यांकन पडताळणीनुसार निश्चित करणे व मालमत्तेचा घसारा काढणे.विम्याच्या उद्देशाने मालमत्तेचे मुल्यांकन करणे. | |
| २ | मालमत्तेचे तांत्रिक मूल्यांकन | |
| | एकूण | |
| | जीएसटी @.........% | |
| | एकूण रक्कम रुपये | |

दिनांक :

स्थळ:

दरपत्रकधारकाची स्वाक्षरी
व कंपनीचा शिक्का